**प्रेस नोट** **दि. २०.०५.२०२६**

# १९३० सायबर हेल्पलाईन, गुन्हे शाखा, मुंबई.

## माहे जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत सायबर फसवणूकीचे गुन्हयातील नागरिकांचे १०१ कोटी रूपये वाचविण्यात १९३० सायबर हेल्पलाईन, गुन्हे शाखा पथकास यश मिळाले.

---

मुंबई शहरातील नागरीकांची सायबर गुन्हयांमध्ये फसवणुक झालेल्या तक्रारींची नोंद करणेकामी व फसवणूक रक्कम सबंधित बँक खात्यामध्ये गोठविण्याकरीता दि. १७/०५/२०२२ रोजी पासुन बृन्हमुंबई पोलीस आयुक्तालय, गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन आहे. यामध्ये मुख्यत्वेकरून शेअर ट्रेडींग/इन्वेस्टमेंट फ्रॉड, डिजीटल अरेस्ट फ्रॉड, ऑनलाईन टास्क फ्रॉड, जॉब फ्रॉड, डेबिट/क्रेडीट कार्ड फ्रॉड, फिशींग इत्यादी प्रकारच्या तक्रारी नागरिकांद्वारे नोंदविल्या जातात. सदर तक्रारी प्राप्त होताच कर्तव्यावर असलेले अधिकारी व अंमलदार हे तात्काळ संबधित बँक, वॉलेट, मर्चंट, पेमेन्ट गेटवे इत्यादींचे नोडल अधिकारी यांच्याशी राष्ट्रीय स्तरावर समन्वय साधून व फॉलोअप घेवून फसवणूक झालेली रक्कम संबधित खात्यांवर गोठविली जाते. नागरीकांची सायबर गुन्हयात फसवणूक झालेली जास्तीत जास्त रक्कम वाचविणे हा १९३० हेल्पलाईनचा मुख्य उद्देश आहे.

दिनांक ०१/०१/२०२६ ते दिनांक १९/०५/२०२६ या कालावधीत हेल्पलाईनवर एकूण २,५५,०९२ कॉल्स नोंदविण्यात आले. यापैकी ३०,३०२ प्रकरणांमध्ये फसवणूकीची रक्कम होल्ड करण्यात यश आले असून, एकूण **रू.१०१,३९,०६,५५६/- (एकशे एक कोटी एकोणचाळीस लाख सहा हजार पाचशे छपन्न रूपये)** एवढी रक्कम वाचविण्यात आली आहे, त्याचे होल्ड करण्याचे प्रमाण २५.६८ % इतके आहे. माहे मे-२०२२ ते मे-२०२६ या कालावधीत नागरिकांच्या सायबर गुन्हयांमध्ये फसवणूक झालेल्या रकमेपैकी **रू. ४९१,५७,८०,७७९/- (चारशे एक्याण्णव कोटी सत्तावण्ण लाख ऐंशी हजार सातशे एकोणऐंशी रूपये)** एवढी रक्कम संबधित बँक खात्यांवर गोठवून वाचविण्यात १९३० सायबर हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा, मुंबई पथकास यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. इरफान शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त, सायबर विभाग, श्रीमती सुवर्णा शिंदे, व.पो.नि., पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे, पो.उ.नि. दत्तात्रय अलगुर, पो.उ.नि. पुनम जाधव (१९३० हेल्पलाईन) यांच्या पथकाने पार पाडली आहे.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही प्रकारची आर्थिक, सायबर फसवणुक झाल्यास तात्काळ **१९३० या हेल्पलाईनवर** संपर्क करून तक्रार नोंदवावी, जेणेकरून आपली फसवणूक झालेली संपूर्ण किंवा जास्तीत जास्त रक्कम वाचवता येईल.

**# cybersafemumbai**
**Report Cyber Crime On Helpline 1930 OR**
**https://cybercrime.gov.in**